ज्ञानगंगा घरोघरी

**Yashwantrao Chavan Maharashtra Open University.**
**Nashik-422222**

## A Report on 2nd International Yoga Day Celebration On 21st June 2016, at Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik, Maharashtra.

The second International Yoga Day was celebrated in YCMOU on 21st June 2016 in the presence of honorable Vice Chancellor Prof.Dr Manikrao Salunkhe and the entire staff of YCMOU that included all the Directors of various Schools, assistant professors,associate professors and other administrative staff members.The on-campus Research Fellows, students of BBA and ITI also participated in celebration.

An eminent Yoga teacher Shri Piraji Narwade and his team from Nisargyogi,Yoga & Naturopathy college, Gangapur road,Nashik , supervised as well as demonstrated various yoga practices as per the government protocol. The expert also discussed the importance and need of yoga in the modern age of stress and competition. The entire staff and students of YCMOU enthusiastically performed all the *Asanas* of yoga and *Pranayam*. Yoga session was started with chanting of 'Pranav Mantra OM' followed by Sookshma Vyayam, Vajrasana, Tadasana, Vrikshashana, Surya Namaskar, Nadi Shodhan Pranayama and Bhramari Pranayama.

There are over 42 study centers affiliated to YCMOU for The 'YOGA Shikshak' program. The 2nd **International Yoga Day** was also celebrated with great enthusiasm at these centers and over 1050 students participated in this celebration.

**Following are the glimpses of the 2nd International Yoga Day Celebration at Yashwantrao Chavan Maharashtra Open University:**









आंतरराष्ट्रीय योग दिवस
२१ जून
श्राव्य केंद्र
आंतरराष्ट्रीय योग दिवस
२१ जून

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## नाशिक मुख्यालय

## मराठी भाषा गौरव दिन

# अहवाल

### प्रास्ताविक

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये राज्यातील शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांनी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचे पत्र दि. २० जानेवारी २०१७ पाठविले होते. शासनाच्या या पत्रास अनुसरून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विविध कार्यक्रम आयोजित करून शासन आदेशाची पूर्तता केली.

### 'बोलु कवतिके' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर अर्थात कवी कुसुमाग्रज यांनी मराठी साहित्य क्षेत्रास दिलेले योगदान आणि मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी घेतलेले परिश्रम विचारात घेऊन २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून राज्य शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि मुक्त विद्यापीठाच्या वतीने रविवार, दि. २६ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ६ वाजता नाशिक येथील महाकवी कालिदास कलामंदिरात सुरभी, पुणे निर्मित 'बोलु कवतिके' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाद्वारे ज्येष्ठ गायक रवींद्र साठे, अनुराधा मराठे, योगिता गोडबोले, श्रीरंग भावे, अशोक काळे यांसारख्या दिग्गजांनी हजेरी लावली.

### रसिक श्रोत्यांची भरभरून दाद

मधुर गीतांची उधळण, भक्तिगीते, भावगीते, लोकगीते, कविता, ओव्या, भारूड, नाट्यगीत, संतरचना, गवळण, चित्रपट संगीत, अभंग, लावणी आणि अभिवाचन अशा रंगारंग सांस्कृतिक जल्लोषात नाशिककर चिंब झाले. टाळ्यांचा कडकडाट, शिट्यांची उत्स्फूर्त दाद अशा अभूतपूर्व वातावरणात 'बोलु कवतिके' सांस्कृतिक कार्यक्रमाचा नाशिककरांनी मनमुराद आनंद लुटला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि राज्य शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिवसाचे औचित्य साधून नाशिककरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सुरभी, पुणे निर्मित 'बोलु कवतिके' या मराठीचे गुणगान गाणाऱ्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील कालिदास कलामंदिरात रविवारची संध्याकाळ सप्तस्वरांच्या आणि अभिवाचनात अक्षरशः हरपून गेली. 'जय शारदे वागेश्वरी' या सरस्वती स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मोगरा फुलला, या जन्मावर... या

जगण्यावर, घनश्याम सुंदरा, राम जन्मला गं सखे, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, झिनी झिनी वाजे बीन, सर्वात्मता शिवसुंदरा, मळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी, माझी मैना यासह असंख्य भावगीते, भक्तिगीते आणि लोकगीतांनी श्रोते चिंब झाले. ज्येष्ठ गायक रवींद्र साठे, अनुराधा मराठे, योगिता गोडबोले, श्रीरंग.भावे, अशोक काळे यांनी गायलेल्या सदाबहार गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. मराठी मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गीतरामायणातील निवडक वेच्यांच्या सादरीकरणाने ही संगीत मैफल मोठ्या उंचीवर गेली. प्राजक्ता राज (अत्रे) यांनी नृत्ये सादर केली. तुषार दळवी, मधुरा वेलणकर, प्रवीण जोशी यांनी खास शैलीत केलेल्या अभिवाचनामुळे कार्यक्रमात रंगत आली.

वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, आचार्य अत्रे, व्यंकटेश माडगुळकर, गदिमा, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, बा. सी. मर्ढेकर यांपासून सुरेश भट, आरती प्रभू, ग्रेस यांच्या साहित्यावर आधारित दृक-श्राव्य कलाविष्कार नाशिककरांना यानिमित्ताने अनुभवायला मिळाला. केदार परांजपे यांनी संगीत संयोजन केलेल्या या विशेष कार्यक्रमासाठी प्रवीण जोशी यांनी संहिता लेखन केले होते.

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधत विद्यापीठाच्या दृक-श्राव्य केंद्राने तयार केलेला माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे राजभाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी रमाकांत परांजपे (व्हायोलीन), प्रसन्न बाम (संवादिनी), राजेंद्र पूरकर (तबला), केदार मोरे (ढोलकी), अभय इंगळे (पाश्चिमात्य तालवाद्ये) आणि केदार परांजपे (सिंथेसायझर) यांनी साथसंगत दिली.

एकूणच मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठीची बीजे नव्या पिढीत रुजविण्यासाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला. हा कार्यक्रम नागरिकांसाठी नि:शुल्क ठेवण्यात आला होता. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास हजारो नाशिककरांची उपस्थिती लाभली.

## पूर्व प्रसिद्धी

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त राज्य शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि मुक्त विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा जास्तीतजास्त नागरिकांना लाभ घेता यावा म्हणून विद्यापीठाने विद्यापीठ स्तरावर कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळ्या समित्या नेमण्यात आल्या. त्यात आयोजन, उद्घाटन व समारोप, वित्त, भोजन, निवास व्यवस्था, अहवाल लेखन अशा विविध समित्या गठित करण्यात आल्या. सदर कार्यक्रम समन्वयक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहि:शाल विभागाच्या प्रमुख डॉ. विजया पाटील यांची नेमणूक करण्यात आली.

या कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागाने प्रसारमाध्यमांद्वारे प्रचार आणि प्रसार केला. त्यात मराठी, इंग्रजी आणि हिंदी वर्तमानपत्रांतून बातम्या, तसेच शनिवार आणि रविवारी दोन दिवस चार सर्वाधिक खपाच्या दैनिक लोकमत, सकाळ, पुण्यनगरी आणि दिव्यमराठी या प्रमुख वर्तमानपत्रांतून विशेष जाहिराती प्रसिद्ध केल्या. याबाबतची वृत्तपत्र कात्रणे सोबत जोडली आहेत. नाशिक शहरातील प्रमुख चौकांत व

साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळ चालविणाऱ्या प्रमुख संस्थांच्या प्रवेशद्वारावर कलर फ्लेक्स लावण्यात आले. याशिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रसिद्धी करण्यात आली. त्यात विद्यापीठाची वेबसाईट, फेसबुक आणि विद्यापीठ परिवारातील सदस्यांच्या whats apps यासारख्या बहुमाध्यमांचा वापर करण्यात आला. बातमी लिंक – मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'बोलु कवतिके' कार्यक्रमाचे आयोजन
http://marathi.eenaduindia.com/Nasik/Nasik/2017/02/24123724/news-in-marathi-programme-organised-for-marathi-language.vpf
https://play.google.com/store/apps/details?id=com.ptg.eenaduindiahl=en
या कार्यक्रमात विद्यापीठासाठी अर्ध्या तासाचा अवधी देण्यात आल्याने विद्यापीठाने या कालावधीत विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने काव्य लेखनासाठी देण्यात येणारा २०१६ चा विशाखा काव्यलेखन पुरस्कारांचे वितरण केले.

## ध्वनिचित्रफीत

'बोलु कवतिके' सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सुरुवातीस राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा सांस्कृतिक मंत्री मा. ना. विनोद तावडे साहेब यांचा संदेश असलेल्या ध्वनिचित्रफितीद्वारे विविध कार्यक्रमांची माहिती दिली. याबरोबरच विद्यापीठाच्या दृक–श्राव्य केंद्राने तयार केलेला माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला.

## निमंत्रण पत्रिका व प्रवेशिका

या कार्यक्रमास शहरातील साहित्य, कला, नाट्य, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांतील जाणकार, प्रसारमाध्यमांचे संपादक, वरिष्ठ पत्रकार आणि हितचिंतकांना देण्यासाठी विद्यापीठाच्या ग्रंथनिर्मिती केंद्राने सुबक अशी रंगीत निमंत्रण पत्रिका छापून त्या वितरित केल्या. याशिवाय कार्यक्रमासाठी प्रवेशिकाही छापून त्या वितरित केल्या.

## विशाखा पुरस्कारांचे शानदार वितरण

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठातर्फे रविवारी राजभाषा दिनाच्या पूर्वसंध्येला कालिदास कलामंदिरात आयोजित करण्यात आलेल्या विशेष समारंभात तीन कवींना सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार निवड समितीमध्ये प्राथमिक फेरीत सर्वश्री दासू वैद्य, राजू देसले, अर्जुन नाईक तर अंतिम निवड समितीमध्ये सौ. प्रतिभा सराफ, अर्जुन नाईक, चंद्रकांत पाटील आणि प्रकाश होळकर यांचा समावेश होता. विशाखा पुरस्कारासाठी डॉ. योगिनी सातारकर–पांडे (नांदेड) यांच्या 'जाणिवांचे हिरवे कोंभ' काव्यसंग्रहास प्रथम पुरस्कार, मोहन कुंभार (सिंधुदुर्ग) यांच्या 'जगण्याची गाथा' काव्यसंग्रहास द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार, तर विष्णू थोरे (नाशिक) यांच्या 'धुळपेरा उसवता' काव्यसंग्रहास तृतीय क्रमांकाचा पुरस्कार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थींना अनुक्रमे २१ हजार, १५ हजार आणि १० हजार रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल विभागाच्या प्रमुख डॉ. विजया पाटील, वित्त अधिकारी मगन पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर होते.

## कार्यक्रमोत्तर प्रसिद्धी

मराठी भाषेचे गुणगान गाणाऱ्या 'बोलु कवतिके' या कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर या कार्यक्रमाची प्रसिद्धीही

विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागाने मोठ्या प्रमाणात केली. याबाबतची वृत्तपत्र कात्रणे आणि लिंक सोबत जोडल्या आहेत. aajchadinkar.blogspot.com, सांस्कृतिक जल्लोषात नाशिककर चिंब, मराठी भाषा दिनाचे औचित्य http://marathi.eenaduindia.com/Nasik/NasikCity/2017/02/28075629/news-in-marathi-marathibhasha-day-celebration.vpf,
https://play.google.com/store/apps/details?id=com.ptg.eenaduindiahl=en

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, विद्यार्थी कल्याण व बहिःशाल विभागाच्या प्रमुख डॉ. विजया पाटील, वित्त अधिकारी मगन पाटील, राजेंद्र मांडगे यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नांदेड विभागीय केंद्र

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सोनखेड महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात ग्रंथदिंडी काढण्यात आली. या भागातील ग्रामीण कथाकार आणि कवींना निमंत्रित करण्यात आले होते. याशिवाय वरिष्ठ पत्रकारांना आमंत्रित करून 'वृत्तपत्रांत मराठी भाषेचा वापर' या विषयावर व्याख्यान व शासन आदेशान्वये युनिकोड वापराबाबत प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याच कार्यक्रमात पोवाडे, भारूड, कविता वाचन यांसारखे कार्यक्रम सादर करून महाराष्ट्राची लोकधारा विद्यार्थ्यांनी सादर केली. या कार्यक्रमासाठी स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते.

## नागपूर विभागीय केंद्र

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्या वतीनेही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विशेषतः दि. ७ मार्च २०१७ रोजी निबंधलेखन, ८ मार्च २०१७ रोजी रांगोळी स्पर्धा, तर ९ मार्च रोजी सुलेखन व हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. १० मार्च २०१७ रोजी निमंत्रित मान्यवरांना बोलावून स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ घेण्यात आला.

**डॉ. दिनेश भोंडे**
कुलसचिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२

दूरध्वनी (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७, २२३३६७७, २२३०७१८




## वाचन प्रेरणा सप्ताह – २०१६

दि. १० ते १५ ऑक्टोबर २०१६

# अहवाल







प्रास्ताविक

## वाचन प्रेरणा सप्ताह

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये १५ ऑक्टोबर–वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे हा दिवस केवळ वाचन प्रेरणा दिनापुरता सिमित न ठेवता दि. १० ते १५ ऑक्टोबर दरम्यान वाचन प्रेरणा दिन सप्ताह घेण्यात आला.

दिनांक १० ऑक्टोबर २०१६ रोजी ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्रामध्ये वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी केले.

दिनांक १३ ऑक्टोबर २०१६ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेत 'शब्दमल्हार व प्रकाशक'चे संपादक श्री. स्वानंद बेदरकर यांनी पहिले पुष्प गुंफले. श्री. बेदरकर यांनी 'वाचन संस्कृती' या विषयावर व्याख्यान सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या डॉ. सुनंदा मोरे व प्र. जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष साबळे व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक १४ ऑक्टोबर २०१६ रोजी वाचन प्रेरणा सप्ताहानिमित्त व्याख्यानाचे दुसरे पुष्प गुंफण्यात आले. हे पुष्प गुंफण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार तथा ज्येष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. श्री. कांबळे यांनी वाचन संस्कृतीवरील व्याख्यान सादर केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे प्रा. दादासाहेब मोरे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजी मा. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. मा. कलाम साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलसचिव व प्राध्यापक डॉ. प्रकाश अतकरे उपस्थित होते. शैक्षणिक सेवा विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. हेमंत राजगुरू, ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे व सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे हे व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. अतकरे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन वैज्ञानिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीवर आपले विचार मांडले.

डॉ. हेमंत राजगुरू यांनी वाचन का, कसे, केव्हा व कोणत्या पुस्तकांचे करावे यावर व्याख्यान सादर केले. श्री. प्रकाश बर्वे यांनी ग्रंथपालन क्षेत्रातील व्यक्तींची सतत नव्याच्या शोधात असताना संशोधनाचा आणि अद्ययावत होत जाणाऱ्या ज्ञानाचा कायम शोध घ्यावा व ते वाचकापर्यंत कसे पोहोचेल यासाठी प्रयत्नशील कसे असावे याबाबत मार्गदर्शन केले.

प्रेरणादिन सप्ताहाचे आयोजन करण्यासाठी विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्राने पुढाकार घेतला. ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताहनिमित्त झालेल्या कार्यक्रमांचा आढावा सादर करून प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर दृक–श्राव्य विभागातील सर्व सहकारी, प्र. जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे, श्री. राजेश बर्वे, सहायक ग्रंथपाल श्री. प्रकाश बर्वे, श्रीमती ललिता टोपे, श्री. परशराम पालवी, श्री. अनंत जोशी, कु. काजल ठोके, कु. ऐश्वर्या सौंदाणे यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, संशोधक विद्यार्थी आय.टी.आय प्रशिक्षणार्थी, बी.बी.ए., बी.लिब.आय.एस्सी, एम.लिब.आय.एस्सी. आदी शिक्षणक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमांसंदर्भातील वृत्तपत्रातील प्रसिद्धी, छायाचित्रे सोबत जोडली आहेत.

**डॉ. दिनेश भोंडे**
कुलसचिव



वाचन प्रेरणा सप्ताहनिमित्त मुक्त विद्यापीठाने वाचन प्रेरणा सप्ताह आयोजित केला होता. त्याचा एक भाग म्हणून वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रदर्शन विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राच्या इमारतीत भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे. समवेत माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे आदी.



प्रदर्शनात मांडण्यात आलेली पुस्तके पाहताना कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे. यांचे समवेत विद्यापीठातील शिक्षकवृंद.




पुस्तक प्रदर्शनाच्या कार्यक्रमात वाचन प्रेरणा दिनाचा उद्देश प्रास्ताविकातून मांडताना ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे. व्यासपीठावर उपस्थित कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आणि माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे.




विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी आणि या कार्यास चालना द्यावी असा संदेश कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी पुस्तक प्रदर्शन कार्यक्रम प्रसंगी दिला.




पुस्तक प्रदर्शन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे.



पुस्तक प्रदर्शन उद्‌घाटन कार्यक्रमास उपस्थित विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी.




'वाचन संस्कृती' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आलेले व्याख्याते स्वानंद बेदरकर यांचे स्वागत करताना विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे. समवेत ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, जनसंपर्क विभागाचे प्रमुख संतोष साबळे.




या कार्यक्रमात प्रास्ताविक करताना ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.




'वाचन संकृती' याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पत्रकार स्वानंद बेदरकर.




'पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात' हे आपल्या भाषणातून उपस्थितांना पटवून देताना पत्रकार स्वानंद बेदरकर. समोर उपस्थित अधिकारी, कर्मचारी व संशोधक विद्यार्थी.




'वाचन संस्कृती' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सकाळ माध्यम समूहाचे संचालक-संपादक तथा ज्येष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांचे स्वागत करताना 'गबाळ'कार प्रा. दादासाहेब मोरे. शेजारी ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे आदी.



उपस्थितांना मार्गदर्शन करताना सकाळ माध्यम समूहाचे संचालक-संपादक तथा ज्येष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे. समोर उपस्थित विद्यापीठातील अधिकारी, विद्यार्थी व कर्मचारी.




'वाचन प्रेरणा दिन सप्ताहा'च्या शेवटच्या पर्वात विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे आणि शैक्षणिक सेवा विभागातील सहायक प्रा. डॉ. हेमंत राजगुरू यांना निमंत्रित करण्यात आले होते.
यावेळी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक करताना ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे.




'वाचन चळवळीत ग्रंथालयांचे महत्त्व' याविषयी मार्गदर्शन करताना शैक्षणिक सेवा विभागातील सहायक प्रा. डॉ. हेमंत राजगुरू.
व्यासपीठावर डावीकडून सहायक ग्रंथपाल श्री. प्रकाश बर्वे, शेजारी माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे,
ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे.




वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांचाच पुढाकार महत्त्वाचा असल्याची भूमिका मांडताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अतकरे. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.




वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या सप्ताहासाठी नाशिकमधील प्रख्यात मान्यवर तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व संशोधक विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. या सर्वांचे आभार मानताना सहायक ग्रंथपाल श्री. प्रकाश बर्वे.

**दै. सकाळ, नाशिक**
दि. १४ ऑक्टोबर २०१६

# वाचन प्रेरणादिनी उद्या प्रत्येक शाळेत वाचन कट्टा

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १३ : येत्या शनिवारी (ता. १५) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती असून, तो दिवस सर्व शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा होतो. या दिवशी दप्तरमुक्त शाळा भरवून प्रत्येक शाळेत डॉ. कलाम वाचन कट्टा स्थापन करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यामुळे या दिवशी जिल्ह्यातील साडेपाच हजार शाळांमध्ये केवळ पुस्तक वाचन व वाचनाच्या फायद्यांबाबत चर्चा होईल.

वाचन प्रेरणा दिवस प्रत्येक शाळेत साजरा करण्याच्या सूचना शिक्षण विभागाने प्रत्येक शाळेला दिल्या असून, यानिमित्त प्रत्येक विद्यार्थ्याला वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा हेतू आहे. या दिवशी प्रत्येक शाळेने राबवायच्या उपक्रमाची यादीच शिक्षण विभागाने दिली आहे. त्यानुसार वाचन प्रेरणादिनी लोकसहभागातून पुस्तके जमा करावीत, तसेच डॉ. अब्दुल कलाम यांना श्रद्धांजली म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने किमान दहा पुस्तकांमधील प्रत्येकी १६ पाने वाचावीत, प्रत्येक शिक्षकाने ऑक्टोबरमध्ये डॉ. कलाम यांनी लिहिलेले कोणत्याही एका पुस्तकाचे वाचन करावे, एक व्यक्ती-एक पुस्तक भेट हा उपक्रम राबवावा, पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करावे. डॉ. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकावर आधारित व्याख्याने घ्यावीत, मुक्तशाळा भरावी व दप्तरमुक्त शाळा करण्यासाठी संकल्प करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**प्राथमिक शिक्षण विभागातर्फे प्रत्येक गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांना सूचना देऊन शासन निर्णयाप्रमाणे वाचना प्रेरणादिन साजरा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, या दिवशी हात धुणे दिवसही पाळला जाणार आहे.**

– **प्रवीण अहिरे,** शिक्षणाधिकारी, प्राथमिक

## मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणा दिन साजरा

**नाशिक, ता. १३ :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'वाचन संस्कृती' या विषयावर व्याख्यान झाले. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. त्यामुळे ते देशाचे आदर्श बनले. यातून पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात हे सिद्ध होते, असे स्वानंद बेदरकर यांनी या वेळी सांगितले.

विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे अध्यक्षस्थानी होत्या. ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे उपस्थित होते.

वाचन माणसाच्या जाणिवा समृद्ध करते. जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याचे डोळे देते, असे सांगून अनुभव आणि अनुभूतीतील फरक विविध अंगांनी बेदरकर यांनी उलगडून सांगितला. ते म्हणाले, की वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आता पालकांनी पुढाकार घेणे गरजेचे असून, विकासाचे समीकरण पुस्तकांशी जोडायला हवे. डॉ. मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. शेवाळे यांनी प्रास्ताविक केले. श्री. साबळे यांनी परिचय करून दिला.



**नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात गुरुवारी वाचन प्रेरणा दिनानिमित्त झालेल्या 'वाचन संस्कृती' या विषयावर बोलताना स्वानंद बेदरकर. शेजारी डॉ. मधुकर शेवाळे, डॉ. सुनंदा मोरे, संतोष साबळे.**

## दै. महाराष्ट्र टाइम्स्, नाशिक
दि. १५ ऑक्टोबर २०१६

# 'पुस्तकांमुळे माणसाचे जीवन समृद्ध'

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**



भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. यामुळे ते देशाचे आदर्श बनले. त्यांच्या मोठेपणाचे बीज वाचनात दडले होते. यातून पुस्तकेच माणसाचे जीवन समृद्ध करतात हे सिद्ध होते, असे प्रतिपादन प्रकाशक स्वानंद बेदरकर यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित पहिल्या व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे होत्या. या वेळी व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे होते.

बेदरकर पुढे म्हणाले, वाचन माणसाच्या जाणीवा समृद्ध करते. जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याचे डोळे देते. ज्याला मन वाचता येते, त्याला माणसांचे चेहरे वाचता येतात. नवीन तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे विद्यार्थी पुस्तकांपासून दुरावत चालला असून, आता केवळ बघणाऱ्यांची आणि पाहणाऱ्यांची संस्कृती दिसतेय. यामुळे दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत आहे. अशा परिस्थितीत ग्रंथालय चळवळ रुजविण्याची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आता पालकांनी पुढाकार देणे गरजेचे असून, विकासाचे समीकरण पुस्तकांशी जोडायला हवे. कारण पुस्तकेच माणसाचे जीवन समृद्ध करतात. पिढ्या उभ्या करण्यासाठी प्रत्येकाने ग्रंथालयात जायला हवे असे आवाहन त्यांनी शवेटी केले. डॉ. सुनंदा मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

**पुण्यनगरी**
शुक्रवार,१४ ऑक्टोबर २०१६

# पुस्तके जीवन समृद्ध करतात : बेदरकर

**नाशिक** – माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. त्यामुळे ते देशाचे आदर्श ठरले. त्यांची सर्व पाळेमुळे वाचनात होती. त्यातून पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात, हे सिद्ध होते, असे प्रतिपादन स्वानंद बेदरकर यांनी केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित वाचन संस्कृती या विषयावर पहिल्या व्याख्यानात बेदरकर बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे होत्या. यावेळी ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्रप्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे, सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे उपस्थित होते. बेदरकर म्हणाले, वाचन माणसाच्या जाणिवा समृद्ध करते. जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याची दृष्टी देते, असे सांगून अनुभव आणि अनुभूतीतील फरक त्यांनी उलगडून सांगितला. मन वाचता येते, त्याला माणसांचे चेहरे वाचता येतात. नवीन तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे विद्यार्थी पुस्तकांपासून दुरावत असून आता केवळ बघणाऱ्यांची व पाहणाऱ्यांची संस्कृती दिसतेय, त्यामुळे दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. या परिस्थितीत ग्रंथालय चळवळ रुजविण्याची नितांत आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. सुनंदा मोरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. डॉ. मधुकर शेवाळे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन करून आभार मानले. संतोष साबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**ऑक्टोबर २०१६**
**यशवार्ता**
मुक्त विद्यापीठातील सहकाऱ्यांचे कौटुंबिक मुखपत्र....

### वाचन प्रेरणादिन व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन

# विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी : डॉ. दिनेश भोंडे




**ज्ञानगंगोत्री :** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणादिन' म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात साजरी करण्यात आली. वाचन प्रेरणादिन व त्यानिमित्ताने आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांच्या हस्ते नुकतेच झाले.

या वेळी माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे आदी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. दिनेश भोंडे यांनी शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. आजच्या विद्यार्थ्यांनी इंटरनेटच्या माध्यमात गुरफटून न जाता वाचनाकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले. यातून भविष्यात चांगले संशोधक आणि विद्यार्थी घडतील, असा विश्वासही व्यक्त केला.

ऑक्टोबर २०१६
यशवार्ता
मुक्त विद्यापीठातील सहकाऱ्यांचे कौटुंबिक मुखपत्र...

## पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात : स्वानंद बेदरकर यांचे प्रतिपादन




**ज्ञानगंगोत्री :** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. यामुळे ते देशाचे आदर्श बनले. त्यांची सर्व पाळेमुळे वाचनात होती. यातून पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात हे सिद्ध होते, असे प्रतिपादन स्वानंद बेदरकर यांनी केले.

विद्यापीठाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित केलेल्या पहिल्या व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे या होत्या. या वेळी व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे होते.

बेदरकर पुढे म्हणाले, वाचन माणसाच्या जाणिवा समृद्ध करते, जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याचे डोळे देते असे सांगून अनुभव आणि अनुभूतीतील फरक विविध अंगांनी उलगडून सांगितला. ज्याला मन वाचता येते, त्याला माणसांचे चेहरे वाचता येतात, असे सांगून विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

डॉ. सुनंदा मोरे यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. संतोष साबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, संशोधक व बीबीएचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे, परशुराम पालवी, ललिता टोपे, अनंत जोशी, काजल ठोके, ऐश्वर्या सौंदाणे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

दै. दिव्य मराठी, नाशिक
दि. २९ ऑक्टोबर २०१६

**उपक्रम** | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणादिन

# पुस्तक वाचनातून होते जीवन समृद्ध : डॉ. मोरे

### 'वाचन संस्कृती' या विषयावर रंगला परिसंवाद

प्रतिनिधी | नाशिक

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या



कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. यामुळे ते देशाचे आदर्श बनले आहेत. त्यांची सर्व पाळेमुळे वाचनात होती. निरंतर पुस्तक वाचनातून माणसाचे जीवन समृद्ध होते, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे यांनी केले.

गंगापूर येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित पहिल्या व्याख्यानात त्या बोलत होत्या. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे होत्या, तर व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे होते. विद्यापीठाच्या यश इन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात बोलताना बेदरकर यांनी सांगितले की, वाचन माणसाच्या जाणिवा समृद्ध करते. जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याचे डोळे देते असे सांगून अनुभव आणि अनुभूतीतील फरक विविध अंगांनी उलगडून सांगितला. ज्याला मन वाचता येते, त्याला माणसांचे चेहरे वाचता येतात. नवीन तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे विद्यार्थी पुस्तकांपासून दुरावत चालला असून, आता केवळ बघणाऱ्यांची आणि पाहणाऱ्यांची संस्कृती दिसतेय, यामुळे दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत चालल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

धावपळीच्या या युगात वाचन संस्कृती टिकणे गरजेचे बनले असल्याचा सूर उपस्थितांतून व्यक्त होत होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. संतोष साबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, संशोधक व बीबीए विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

गांवकरी
नाशिक, शनिवार
दि. १५ ऑक्टोबर २०१६

# मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणादिन साजरा

। नाशिक ।

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठात काल वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी वाचन संस्कृती विषयावर करण्यात आले. यावेळी वाचन संस्कृती विषयावर करण्यात आले. त्यात स्वानंद बेदरकर म्हणाले की, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी सदैव आपल्या कृतीतून समाजाला प्रेरणा दिली. यामुळे ते देशाचे आदर्श बनले. त्यांची सर्व पाळेमुळे वाचनात होती. यातून पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात हे सिद्ध होत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने वाचन संस्कृती या विषयावर आयोजित पहिल्या व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी विद्यापीठाच्या नियोजन अधिकारी डॉ. सुनंदा मोरे ह्या होत्या. या वेळी व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रभारी जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे होते.

विद्यापीठाच्या यश इन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात बोलताना बेदरकर पुढे म्हणाले, वाचन माणसाच्या जाणीवा समृद्ध करते. जगण्याची सजगता तसेच माणसाकडे पाहण्याचे डोळे देते असे सांगून अनुभव आणि अनुभूतीतील फरक विविध अंगांनी उलगडून सांगितला. ज्याला मन वाचता येते, त्याला माणसांचे चेहरे वाचता येतात. नवीन तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे विद्यार्थी पुस्तकांपासून दुरावत चालला असून आता केवळ बघणाऱ्यांची आणि पाहणाऱ्यांची संस्कृती दिसतेय, यामुळे दिवसेंदिवस वाचन संस्कृती लोप पावत चालल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अशा परिस्थितीत ग्रंथालय चळवळ रुजविण्याची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आता पालकांनी पुढाकार देणे गरजेचे असून विकासाचे समीकरण पुस्तकांशी जोडायला हवे. कारण पुस्तकेच माणसाचे जीवन समृद्ध करतात. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांचे अनेक दाखले देत ज्ञानाचे पाणी शोषून ते कसे मोठे झाले हे त्यांनी अनेक उदाहरणांनी पटवून दिले. पिढ्या उभ्या करण्यासाठी प्रत्येकाने ग्रंथालयात जायला हवे असे आवाहन त्यांनी या वेळी केले. डॉ. सुनंदा मोरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. संतोष साबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, संशोधक व बीबीए विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

दै. पुढारी, नाशिक
दि. १९ ऑक्टोबर २०१६




**नाशिक :** ‘वाचन संस्कृती’ विषयावर मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे.

# वाचन संस्कृती रुजणे आवश्यक : कांबळे

**नाशिक : प्रतिनिधी**

समाज जीवनात पुस्तकेच माणसात लढण्याची क्षमता निर्माण करतात. कला हे माणसांच्या संवेदना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे आणि असून, अशा संवेदना विकसित करण्याचे काम पुस्तके करतात. पुस्तक हे ज्ञानाचे झाड आहे. भाषेच्या विकासासाठी वाचन संस्कृती रुजणे आवश्यक असल्याचे, प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार उत्तम कांबळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणा दिन उत्साहात पार पडला. यावेळी ‘वाचन संस्कृती’ या विषयावर कांबळे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. दादासाहेब मोरे होते. व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे उपस्थित होते.

कांबळे पुढे म्हणाले, ज्याला दृष्टिकोन पाहिजे त्याने पुस्तके वाचावीत. कारण निसर्ग डोळे देतो आणि ग्रंथ दृष्टी देतात. डोळे ही माणसाची ग्लोबल भाषा असते. ग्रंथाच्या वाचनातून माणसाला विचार मिळतो. काळ, काम, गती हे सर्व बदलांतून येते असे सांगून जगातील सर्व दु:खांचा जन्म हा मार्मिक तृष्णेतून होतो असे ते म्हणाले.

वैयक्तिक जीवनातील जगण्याच्या संघर्षाचे उदाहरण देत दु:खावर मात करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी केलेले प्रयत्न आणि पुस्तकांपर्यंतचा प्रवास त्यांनी सांगितला. यावेळी प्रा. दादासाहेब मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ऑक्टोबर २०१६
यशवार्ता
मुक्त विद्यापीठातील सहकाऱ्यांचे कौटुंबिक मुखपत्र...

# पुस्तके वाचल्याशिवाय भाषेचा विकास नाही : उत्तम कांबळे




**ज्ञानगंगोत्री :** समाजजीवनात पुस्तकेच माणसात लढण्याची क्षमता निर्माण करतात. कला ही माणसांच्या संवेदना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन असून अशा संवेदना विकसित करण्याचे काम पुस्तके करतात. पुस्तक हे ज्ञानाचे झाड असून ती वाचल्याखेरीज भाषेचा विकास होत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा पत्रकार उत्तम कांबळे यांनी केले.

विद्यापीठाने वाचन प्रेरणादिनाच्या निमित्ताने 'वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित दुसऱ्या व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. दादासाहेब हे होते. या वेळी व्यासपीठावर ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे होते.

उत्तम कांबळे म्हणाले, ज्याला दृष्टी पाहिजे त्याने पुस्तके वाचावीत. कारण निसर्ग डोळे देतो आणि ग्रंथ दृष्टी देतात. डोळे ही माणसाची ग्लोबल भाषा असते. ग्रंथांच्या वाचनातून माणसाला विचार मिळतो. काळ, काम, गती हे सर्व बदलांतून येते असे सांगून जगातील सर्व दु:खांचा जन्म हा मार्मिक तृष्णेतून होतो, असे ते म्हणाले. जिथे पोकळी असते तिथेच नवनिर्माण होते. यासाठी पुस्तकांशी संवाद साधला जाणे आवश्यक आहे. पुस्तके आणि वाचनसंस्कृती याविषयी बोलताना उत्तम कांबळे यांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनातील जगण्याचा संघर्ष मांडला. दु:खावर मात करण्यासाठी वेळोवेळी केलेले प्रयत्न आणि पुस्तकांपर्यंतचा प्रवास त्यांनी विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केला.

प्रा. दादासाहेब मोरे यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मधुकर शेवाळे यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, संशोधक व बीबीएचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक भास्कर
शनिवार, 15 अक्टूबर 2016

# किताबे पढ़े बिना भाषा का विकास असंभव : कांबले




संवाददाता | नाशिक

किताबे इन्सान में लढ़ने की क्षमता निर्माण करते हैं। कला यह इन्सान की संवेदना व्यक्त करने का प्रभावी माध्यम है। वह संवेदना विकसित करने का कार्य करते हैं। किताब ज्ञान का पेड़ है। जिन्हें पढ़े बिना भाषा का विकास असंभव है। यह कहना है विख्यात साहित्यिकार तथा वरिष्ठ पत्रकार उत्तम कांबले का।

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विश्वविद्यालय ने वाचन प्रेरणा दिन के औचित्य पर वाचन संस्कृति विषय पर आयोजित की संगोष्ठी में श्री कांबले ने अपने विचार व्यक्त किए। मंच पर प्रा.दादासाहब मोरे, ग्रंथालय व सूचनास्त्रोत केंद्र प्रमुख डा.मधुकर शेवाले उपस्थित थे। श्री कांबले ने कहा जिन्हें दृष्टी चाहिए उन्होंने किताबे जरूर पढ़नी चाहिए। क्योंकि प्रकृति हमे आंखे देती है और ग्रंथ दृष्टी। आंखे यह इन्सान की ग्लोबल भाषा है। ग्रंथों के पठन से इन्सान को विचार मिलते है। काल, काम, गति यह सब बदलाव से आते है। विश्वक के सभी दु:खों का जन्म मार्मिक तृष्णा से होता है। जहां कमी निर्माण होती है, वहीं नवनिर्माण होता है। इसके लिए किताबों के साथ संवाद जरूरी है। किताबे व पठन संस्कृति विषय पर बोलते हुए श्री कांबले ने अपने व्यक्तिगत जीवन का संघर्ष विषद किया।

इस दौरान प्रा.मोरे ने भी अपने विचार व्यक्त किए। प्रस्तावना, संचालन व आभार मंच डा. मधुकर शेवाले ने किया। कार्यक्रम में विश्वविद्यालय के अधिकारी, शिक्षक, संशोधक, बीबीए के छात्र-छात्राए बड़ी संख्या में उपस्थित थे। सफलता हेतु सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे आदि प्रयासरत थे।

Daily Lokmat Times
Dat : 18 Oct. 2016

# YCMOU celebrates Vachan Prerana Din

## Birth anniversary of Dr APJ Abdul Kalam




University's former registrar professor Dr Prakash Atkare, Dr Madhukar Shevale, Dr Hemant Rajguru, Prakash Barve and others in the Vachan Prerana Din programme organised at Yashwantrao Chavan Maharashtra Open University

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, OCT 17

The birth anniversary of former President of India Bharatratna Dr APJ Abdul Kalam was observed as 'Vachan Prarana Din' (day to encourage reading) by Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU).

The university had organised a five-day programme on this occasion in which various initiatives were conducted by it.

University's former registrar professor Dr Prakash Atkare was the chief guest for the programme. Library and information centre head Dr Madhukar Shevale, joint professor of educational services Dr Hemant Rajguru, assistant librarian Prakash Barve were present on the dais.

In his speech Dr Prakash Atkare gave information about Dr APJ Abdul Kalam and his work in educational, political and technology. He also informed that Dr Kalam had trust in the youth of this country. "Dr Kalam could get such an honour just because of the heard-efforts taken by him in his sector," Atkar said.

Dr Hemant Rajguru explained the importance of reading in life and also guided about what should be read and when should be read. Prakash Barve provided information about the movement for encouragement to read as well as participation of people from library sector in it.

Dr Madhukar Shevale gave information about various programmes conducted during this mission from October 10 to October 15, 2016. he also explained the motive of this initiative and the importance of the habit of reading for individual person as well as for the entire society.

Dr Shevale anchored the programme and proposed vote of thanks. The programme was attended by teachers, students and researchers.

लोकमत नाशिक, सोमवार, दि. १७ ऑक्टोबर २०१६ ७

अब्दुल कलाम जयंती : शाळांमध्ये वाचन उपक्रम, वाचनालयांचे लाभले सहकार्य

# विद्यार्थ्यांना लाभली वाचनाची प्रेरणा




मुक्त विद्यापीठात आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलताना हेमंत राजगुरु. व्यासपीठावर मधुकर शेवाळे, प्रकाश बर्वे, प्रकाश अतकरे.

वाचन प्रेरणा दिन

## मुक्त विद्यापीठ

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या कृषिविज्ञान शाखेतील प्राध्यापक आणि माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, शैक्षणिक सेवा विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. हेमंत राजगुरु व सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे हे उपस्थित होते. डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचा आढावा घेतला. प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार डॉ. शेवाळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**दै. पुढारी, नाशिक**

दि. १८ ऑक्टोबर २०१६

# मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणादिन साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या कृषिविज्ञान शाखेचे प्राध्यापक आणि माजी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे उपस्थित होते. व्यासपीठावर ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, प्रा.डॉ. हेमंत राजगुरू उपस्थित होते.

डॉ. प्रकाश अतकरे मार्गदर्शन करताना म्हणाले, डॉ.कलाम हे त्यांच्या कर्तृत्वाने महान बनले. देशाचे भवितव्य युवा पिढीच्या हाती आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता.



**नाशिक : वाचन प्रेरणा दिनानिमित्त बोलताना प्रा. हेमंत राजगुरु.**

## शारदा प्रसारक मंडळ

शारदा विद्या प्रसारक मंडळाच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त हायस्कूलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष आर. व्ही. जोशी, संस्थेचे सचिव एस. बी. वैद्य, उपाध्यक्ष आर. एन. घुगे उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले. स्वाती पवार यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. दरम्यान, जैन सोशल ग्रुप सेंट्रलच्यावतीने शाळेस पाच हजार रुपयांचे क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. याप्रसंगी जैन सोशल ग्रुपचे अजय मंचरकर, पवन बेदमुथा, नितीन भंडारी, डॉ. रूपेश दुगड, पुनीत संकलेचा आणि विजय कोटेचा आदी उपस्थित होते.

डॉ. हेमंत राजगुरू म्हणाले अध्ययनाचा अनुभव थेट वाचनाशी असतो. वाचनाने जगभरातील विचारवंतांच्या विचाराशी आपण जुळतो, असे सांगितले. प्रकाश बर्वे यांनी ग्रंथपाल क्षेत्रातील व्यक्तींना वाचन चळवळीची माहिती दिली. डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा आढावा घेतला.

# Poetry reading "Vinda's Tripadi"-2017

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक - 422222

जा.क्र. : यचमवि/कुल/2017/775

दिनांक : 18.04.2017

## परिपत्रक

"विंदांची त्रिपदी"

'रसरशीत जीवनशक्ती', 'क्रांतिकारी सामाजिक जाणीव', 'संस्कृतीतून फुललेल्या प्रतिमा' ही विंदांची त्रिपदी. नव्या पिढीत काव्याची गोडी निर्माण व्हावी, जगण्याची उमेद आणि नवी दृष्टी मिळावी, रसिकांना मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कृत कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेतील तत्त्वचिंतन, जीवनदृष्टी कळावी आणि रसग्रहण अधिक चांगले व्हावे या उद्देशाने "विंदांची त्रिपदी" हा आयुष्याचे सार उलगडून दाखवणारा विंदांच्या कवितेवर आधारित कार्यक्रम डॉ. आनंद करंदीकर आणि श्रीमती सरिता आवाड सादर करत असतात. विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनातर्फे विद्यार्थी आणि विद्यापीठ सहकाऱ्यांसाठी दि. 19 एप्रिल रोजी 12 ते 1.30 या वेळेत डॉ. आनंद करंदीकर आणि श्रीमती सरिता आवाड "विंदांच्या त्रिपदीचे" सादरीकरण करणार आहेत. कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेतील तत्त्वचिंतन, जीवनदृष्टी विवेचन आणि सादरीकरण ऐकण्याची संधी यानिमित्ताने आपल्याला मिळेल.

बीबीए, बीएस्सी, पीएचडीच्या विद्यार्थ्यांनी तसेच विद्यापीठातील सहकाऱ्यांनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा. कार्यक्रम शैक्षणिक इमारतीतील सभागृहात वेळेवर होईल.

कुलसचिव

प्रत : सर्व संचालक, विद्याशाखा/विभाग/केंद्र व कक्ष,

यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी / विद्यार्थी (BBA, Ph.D, ITI) यांना सदरील परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.

प्रत माहितीसाठी : मा. कुलगुरू कार्यालय








Dr. Anand Karandikar performing "Vinda's Tripadi" for employees and students of the university. Program orgnized by Kusumagraj Adhyasan on 19.4.2017.